सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
कार्यालय
# अपर आयुक्त आदिवासी विकास
आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर – ४४० ०१०
दूरध्वनी क्र. : ०७१२–२५६०१२७, २५६०३१४ फॅक्स क्र. : ०७१२–२५६५००८ ई–मेल : atcngpedu@gmail.com

क्र. शिक्षण-२०१७/प्र.क्र.११/का.३(२)/ ४६८२ दिनांक :२४/०७/२०१९

**परिपत्रक**

विषय :- **शासकीय आदिवासी मुला-मुलींचे वसतीगृहातील गृहपाल यांनी मुख्यालयी (वसतीगृह इमारतीत) वास्तव्य करणेबाबत.**

संदर्भ :- मा.मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय मुंबई यांनी शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृह, झिंगाबाई टाकळी, नागपूर येथे दिनांक १५.०७.२०१९ रोजी भेटीच्या वेळी दिलेले निर्देश.

आदिवासी विकास विभाग, नागपूर अंतर्गत एकुण १२१ शासकीय आदिवासी मुला-मुलींचे वसतीगृह कार्यरत असून शैक्षणिक सत्र २०१९-२० ला नुकतीच सुरुवात झालेली आहे. वसतीगृहातील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे पालकत्वाची जबाबदारी गृहपालाकडे असून निवासी विद्यार्थ्यांची / विद्यार्थीनीची सर्वांगीण काळजी घेणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्याकरीता शासनाने गृहपालांची नियुक्ती केलेली आहे हे आपणास विदीतच आहे.

उक्त पदांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या शासनाद्वारे निश्चित करण्यात आली असून त्याप्रमाणे संबंधीतांनी आपली कर्तव्य व जबाबदारी पारपाडणे हे क्रमप्राप्त आहे. परंतू सदरच्या **जबाबदाऱ्या निष्ठेने व जबाबदारीने पार पाडीत नसल्याचे मा. मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय मुंबई यांनी शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृह, झिंगाबाई टाकळी, नागपूर येथे दिनांक १५.०७.२०१९ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी निदर्शनास आले आहे**. तसेच **गृहपाल हे मुख्यालयी (वसतीगृह इमारतीत) राहत नसल्याने विद्यार्थी / विद्यार्थीनींना विविध अडचणींना** सामोर जावे लागते, ही बाब खचितच अयोग्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय, अत्याच्याऱ्यांची घटना घडतात आणि नाहक बदनामी होऊन विभागाची प्रतिमा जनमानसात मलीन होते. तद्वतच, विद्यार्थ्यांच्या सामाजिक व शैक्षणिक बाबींवर विपरीत परिणाम होवून त्यांचे शैक्षणिक व सामाजिक नुकसान होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

शासकीय आदिवासी मुला-मुलींचे वसतीगृहाच्या इमारती शासकीय असोत किंवा खाजगी भाडयाच्या इमारतीत असो, **गृहपालांनी विद्यार्थीनी / विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वसतीगृह इमारतीत मुख्यालयी असणे अत्यंत आवश्यक आहे**. गृहपाल हे मुख्यालयी (वसतीगृह इमारतीत) राहत नसल्याचे अथवा गैरहजेरीमुळे / बेजबाबदारपणामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत गृहपाल यांच्यावर शासनाचे प्रचलित **धोरणानुसार कारवाई** करण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील नमूद केलेल्या गैरसोयीमुळे विद्यार्थी मृत्यु, अत्याचार व इतर धोकादायक प्रकरणात गृहपाल दोषी आढळून आल्यास फौजदारी स्वरुपाची कारवाई देखील करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**पुढील पानावर...**

Scanned by CamScanner

तसेच प्रकल्प अधिकारी व त्यांचे क्षेत्रीय अधिकारी यांनी दौऱ्याचेवेळी त्यांचे कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या वसतीगृहांमध्ये वेळेवेळी भेटी देऊन गृहपाल हे मुख्यालयी (वसतीगृह इमारतीत) राहतात किंवा नाही याची शहानिशा करुन वसतीगृह प्रशासनामध्ये काही अडचणी असल्याचे निदर्शसनास आल्यास वेळीच निपटारा करण्याची दक्षता घ्यावी आणि भेटीच्या वेळी कर्तव्यच्युति करणाऱ्या गृहपालांवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करावी.

**(डॉ. संदीप रेवाजी राठोड, भा.प्र.से.)**
अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नागपूर

प्रति,

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर/भंडारा/देवरी/चिमूर/चंद्रपूर/गडचिरोली /अहेरी/ भामरागड त्यांना सूचित करण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील कार्यरत असलेल्या शासकीय वसतीगृहातील गृहपाल यांना उक्त परिपत्रकाची प्रत आपलेस्तरावरुन उपलब्ध करुन देऊन त्याची पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रतिलिपी :- १. मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे स्विय सहाय्यक
२.मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२
३.मा.आयुक्त, आदिवासी विकास, म.रा.नाशिक

अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नागपूर

Scanned by CamScanner